# दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स

खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)

मो. नं. 9271713368,
9860330587



दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २२३ । शनिवार ३० मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


## आमदार कर्डीले ते तनपुरेंचा भाजप प्रवेश

### पडद्यामागचे सूत्रधार डॉ. सुजय विखे पाटील । एकीकडे कर्डीले विजयी, दुसरीकडे तनपुरे भाजपमध्ये; विखेंचा डबल स्ट्राइक




**मुंबई (प्रतिनिधी) –** अहिल्यानगर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे प्रमुख नेते, माजी मंत्री आणि जयंत पाटील यांचे भाचे प्राजक्त तनपुरे यांनी आज भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा मुंबई येथील पक्षकार्यालयात पार पडला.

भाजपमध्ये प्रवेशासोबतच प्राजक्त तनपुरे यांची विधान परिषद उमेदवारीही जवळपास निश्चित मानली जात असून, या घडामोडीमुळे शरद पवार गटाला अहिल्यानगर जिल्ह्यात मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. राज्यात राज्यमंत्री म्हणून काम केलेले तनपुरे यांचा भाजप प्रवेश हा जिल्ह्याच्या राजकारणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजप उमेदवार अक्षय कर्डीले यांना उमेदवारी मिळवून देण्यापासून ते त्यांना विजयी करून विधानसभेत पाठविण्यापर्यंतच्या संपूर्ण राजकीय घडामोडींमध्ये डॉ. सुजय विखे पाटील यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

पक्षांतर्गत समन्वय साधत त्यांनी भाजप नेतृत्वाशी सातत्याने संपर्क ठेवला आणि उमेदवारी निश्चित झाल्यानंतर स्वतः मैदानात उतरून राहुरी, नगर आणि पाथर्डी मतदारसंघात प्रचाराची प्रभावी धुरा सांभाळली. तब्बल ११ पेक्षा जास्त सभा घेत त्यांनी पक्ष संघटना आणि कार्यकर्त्यांना एकत्र बांधत अक्षय कर्डीले यांच्या विजयासाठी निर्णायक वातावरण निर्माण केले. त्यामुळे कर्डीले यांच्या विजयामागील प्रमुख रणनीतिकार म्हणून डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे पाहिले गेले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाने भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मध्यस्थीनंतर प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी विधानसभा पोटनिवडणूक न लढण्याचा निर्णय घेतला होता. यावेळी पोटनिवडणूक जाहीर होण्याच्या आधी तब्बल सहामहिन्यांपासून डॉ सुजय विखे पाटील प्राजक्त तनपुरे यांच्या संपर्कात होते.

याच राजकीय रणनीतीचा पुढचा टप्पा म्हणजे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचा भाजप प्रवेश झाला असून जिल्ह्यातील बदलत्या राजकीय समीकरणांचा ■ पान ४ वर

## एमआयडीसीतील कंपनीत चोरी करणारा जेरबंद

### चाळीस हजारांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नागापूर एमआयडीसी येथील एका एंटरप्रायझेस कंपनीचे छताचे पत्रे उचकटून आत प्रवेश करत ७० हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या निकेल प्लेट्स चोरी करणाऱ्या आरोपीला एमआयडीसी पोलिसांनी गजाआड केले आहे. छोटन मियाँ मुल्लु मियाँ (वय २६, मूळ रा. बिहार, सध्या रा. नागापूर एमआयडीसी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

सावेडी येथील व्यावसायिक संदीप रामभाऊ ठोकळ यांच्या नागापूर एमआयडीसीतील कंपनीतून दि. २० मे ते २१ मे २०२६ च्या दरम्यान अज्ञात चोरट्याने ७० हजार ९१८ रुपये किमतीच्या ३०.५ किलो वजनाच्या निकेल प्लेट्स चोरून नेल्या होत्या. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपी छोटन मियाँ याला ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून ४०,१२० रुपये किमतीच्या १७ किलो वजनाच्या निकेल प्लेट्स जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ राजू सुद्रीक, सचिन आडबल व पथकाने केली.

## आजोबावर गोळीबार करणारा फरार आरोपी एलसीबीकडून ताब्यात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राहुरी येथे आजोबावर गोळीबार करून फरार झालेला आरोपी प्रवीण बाबासाहेब कोहकडे (वय २२ वर्षे, रा. मोमीन आखाडा, ता. राहुरी) याला स्थानिक गुन्हे शाखेने मुळा धरण परिसरातून गावठी कट्टयासह ताब्यात घेतले आहे.

गुन्हा दाखल केल्याच्या कारणावरून दिनांक २९ रोजी सकाळी सहाच्या सुमारास फिर्यादी दगडू गंगाराम कोहकडे (रा. मोमीन आखाडा, ता. राहुरी) यांच्यावर ■ पान ४ वर

## बनावट महिला उभी करून शेतजमिनीची परस्पर विक्री

### पारनेर तालुक्यातील हंगा येथील प्रकार । दुय्यम उपनिबंधकांच्या तक्रारीवरून फसवणुकीचा गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** चाळीस वर्षांपूर्वी मयत झालेल्या महिलेच्या जागेवर बनावट महिला उभी करून शेतजमिनीची परस्पर विक्री केल्याचा प्रकार पारनेर तालुक्यातील हंगा येथे घडला. या प्रकरणी पारनेरचे दुय्यम उपनिबंधक दिलीप गोविंद गायकवाड (वय ४८ वर्षे, रा.चिपाडेमळा, सारसनगर ता.जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पारनेर पोलीस ठाण्यात अजित हिराभाऊ सोनवणे (रा. निघोज ता. पारनेर), अज्ञात महिला चंपाबाई मधुकर सोनवणे (सासरकडचे नाव) चंपा शंकर सूर्यवंशी (माहेरकडचे नाव, रा.रुम नं ३१२ बी.आय.टी चाळ शिवडी मुंबई) नवनाथ सखाराम कावळे (वय ३६ वर्षे रा.पिंपरी कावळ ता.जि. पुणे), विकास पाडळे (रा. बुध्दमंदीर एस.जी. बर्वे मार्ग, ठक्कर बाप्पा कॉलनी चेंबुर मुंबई), किरण गुंजाबा शिंदे (रा. तारकंद भवन सोसायटी, एस. जी. बर्वे रोड, ठक्कर बाप्पा कॉलनी चेंबूर मुंबई) व त्यांना साक्षीदार ■ पान ४ वर

## पारनेर हद्दीत ७ हॉटेल्सवर कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पारनेर तालुक्यातील भाळवणी, टाकळी ढोकेश्वर आणि भनगडेवाडी परिसरातील तब्बल ७ हॉटेल्सवर छापे टाकून पोलिसांनी एकूण ८३ हजार ४९० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी सात जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्यावर पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि माणिक चौधरी यांना पारनेर हद्दीतील हॉटेल्सवर सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पोलीस पथकाने दि. २८ मे रोजी विविध ठिकाणी छापे टाकले. हॉटेल साई चायनीज (भाळवणी) येथे आरोपी अजय बापू भिसे (वय २५), हॉटेल मधुरा (भाळवणी) येथे आरोपी बाबासाहेब सीताराम रोहोकले (वय ३४), हॉटेल समाधान (भनगडेवाडी) येथे शुभम किरण रोहोकले (वय २२), हॉटेल न्यू समाधान (भनगडेवाडी) येथे आरोपी धीरज बाजीराव ठोकळ (वय २४), हॉटेल वर्षा (टाकळी ढोकेश्वर) येथे आरोपी दिनकर आनंदा नवले (वय ५०), हॉटेल रायबा (भाळवणी) येथे आरोपी महेश गोरख रोहोकले (वय ३४), हॉटेल गावकरी (टाकळी ढोकेश्वर) येथे आरोपी महेश कृष्णाजी ऊर्फ बाबासाहेब झावरे (वय ३५) यांच्यावर कारवाई करून दारू जप्त ■ पान ४ वर

## लाखोंच्या चांदीच्या पार्टवर कंपनीतील कर्मचाऱ्याचा डल्ला

### प्रथमेश इंडस्ट्रीजमधील चोरीचा एमआयडीसी पोलिसांकडून छडा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एमआयडीसी परिसरातील प्रथमेश इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड कंपनीतून इलेक्ट्रिकल स्विचसाठी वापरण्यात येणाऱ्या तब्बल ८ लाख ३९ हजार ६१९ रुपये किमतीच्या चांदीच्या पार्टची चोरी करणाऱ्या आरोपीला जेरबंद करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. विशेष म्हणजे कंपनीत काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्यानेच हा डल्ला मारल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून, त्याच्याकडून चोरीतील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

याप्रकरणी कंपनीचे स्टोअर मॅनेजर प्रदीप प्रभाकर गायकवाड (वय ४७, रा. भिस्तबाग चौक, सावेडी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. २१ मे २०२६ च्या सायंकाळी ६:३० ते २२ मे २०२६ च्या दुपारी २:०० वाजेच्या दरम्यान, अज्ञात चोरट्याने नागापूर एमआयडीसी येथील प्रथमेश इंडस्ट्रीजच्या स्टोअर रूममधील लोखंडी रॅकमधून ८ लाख ३९ हजार ६१९ रुपयांचे चांदीचे पार्ट चोरून नेले होते. या तक्रारीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांना ■ पान ४ वर

## जनगणना जनजागृतीसाठी डॉ. अमोल बागुल यांची 'जनगणना ब्रँड अँबेसिडर'

### अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने जनगणनेमध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांचा समावेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक तथा जगातील सर्वाधिक पारितोषिक विजेते कलाकार डॉ. अमोल बागुल यांची भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत ''जनगणना ब्रँड अँबेसिडर'' म्हणून निवड व नियुक्ती करण्यात आली आहे. जनगणनेविषयी नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी डॉ.बागुल विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सामाजिक माध्यमांचा प्रभावी वापर करून जनजागृती मोहिमेला ■ पान ४ वर



## मारलेली मिठी आणि आजोबा-नातवाच्या इतिहासाला उजाळा

### तनपुरेंच्या पक्षप्रवेशात रंगला दोन 'दादां'चा अलिंगन सोहळा




**मुंबई (प्रतिनिधी) –** भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत आज शरद पवार पक्षाचे माजीमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. मुंबईतील पक्ष कार्यालयात झालेल्या या सोहळ्यासाठी राहुरी, पाथर्डी व नगर तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉं. सुजय विखे पाटील यांचा मुत्सद्दीपणामुळेच तनपुरेंचा भाजप प्रवेश झालाय, यावर या कार्यक्रमात शिक्कामोर्तब झाले. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तनपुरेंसारखा प्रश्नांची जाण असलेला तरुण नेता पक्षात आल्यामुळे पक्षाला फायदाच होईल, हे आवर्जून सांगितलं. पक्षप्रवेशानंतर तनपुरे यांनी अगोदर चव्हाण यांचा व त्यानंतर डॉं. सुजय विखेंचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याच सत्कारानंतर दोन दादा एकत्र आले, आजोबानंतर आता नातूही एक झाले याची आठवण आवर्जून काढली. त्यावेळी एकच हाशा पिकला. सुजय विखे व प्राजक्त तनपुरे यांनी लोकसभेला एकमेकांच्या विरोधात काम ■ पान ४ वर

## श्री अवतार मेहरबाबा परपिच्युअल चॅरिटेबल ट्रस्ट यंदाच्या वर्षी २००० वृक्ष लावणार– फरमरोज मिस्त्री

### मेडिसिनल आयुर्वेदिक वृक्षांचे प्रमाण जास्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अरणगाव रस्त्यावरील जगप्रसिध्द अवतार मेहेरबाबा यांच्या पदस्पर्शाने, वास्तव्याने पावन झालेल्या क्षेत्रामध्ये यंदाच्या वर्षी अवतार मेहेरबाबा परपिच्युअल चॅरीटेबल ट्रस्ट च्या वतीने सुमारे २००० झाडांची लागवड करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे चेअरमन फरमरोज मिस्त्री यांनी दिली .या मध्ये फळझाडांन बरोबरच रुग्णांच्या साठी उपयोगी अश्या आयुर्वेदिक वृक्षांचेही प्रमाण मोठे आहे. याविषयी अधिक बोलताना मिस्री म्हणाले कि सुमारे १५ वर्षापूर्वी तेव्हाचे कृषी तज्ञ मेहेरबाबांचे भक्त दादी केरावाला यांच्या वृक्ष लागवडीच्या संकल्पनेतुन आम्ही हा स्तुत्य उपक्रम सुरू केला होता.

आज हा उपक्रम आम्ही सर्व ट्रस्टी अग्रक्रमाने सातत्याने राबवित असुन ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### आभा कार्ड असूनही शिक्षक कॅशलेस उपचारांपासून वंचित



अहिल्यानगर- राज्यातील हजारो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ''आभा () कार्ड'' काढत असले तरी प्रत्यक्षात खासगी रुग्णालयांमध्ये त्यांना कॅशलेस उपचार सुविधा मिळत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदन पाठविले असून, या संदर्भात त्यांचे लक्ष वेधण्यात आले आहे.शिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार राज्यातील १०० टक्के अनुदानित खासगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आभा कार्ड काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासनाचा हा निर्णय स्वागतार्ह असला तरी प्रत्यक्ष उपचाराच्या वेळी अनेक खासगी रुग्णालयांकडून शिक्षकांना कॅशलेस सुविधा नाकारली जात असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे की, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी समाज घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असताना गंभीर आजार, अपघात किंवा वैद्यकीय संकटाच्या वेळी त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक शिक्षकांना लाखो रुपयांचा वैद्यकीय खर्च करावा लागत असून शासनाच्या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळत नसल्याने ही योजना केवळ कागदोपत्री राहण्याची भीती निर्माण झाली आहे.प्रसाद शिंदे यांनी शासनाकडे राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आयुष्यमान भारत योजनेत पूर्ण समावेश करण्याची मागणी केली आहे. तसेच सर्व खासगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचार सुविधा बंधनकारक करण्यात यावी, आभा कार्डधारक शिक्षकांना उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि जिल्हास्तरावर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.यासोबतच, ''जोपर्यंत सर्वसमावेशक योजना पूर्णपणे कार्यान्वित होत नाही, तोपर्यंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पूर्वीप्रमाणे वैद्यकीय बिले स्वीकारण्यात यावीत,'' ही प्रमुख मागणीही प्रसाद शिंदे यांनी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे. या विषयावर लवकरच नाशिक शिक्षक मतदार संघाचे आमदार किशोर दराडे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांची भेट घेणार असल्याची माहिती शिंदे यांनी दिली.

### सेवापूर्तीचा सुवर्णकलश': आदर्श शिक्षणव्रती बाबासाहेब वैद्य सरांचा देदीप्यमान जीवनप्रवास

अहिल्यानगर- अध्यापन हे केवळ एक कर्म नसून ती एक अखंड चालणारी साधना आहे. या साधनेत स्वतःला झोकून देऊन हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा प्रकाश पेरणारे एक उत्तुंग व्यक्तिमत्व म्हणजे मा. श्री. बाबासाहेब किसनराव वैद्य सर. १ जून १९६८ रोजी सुगावच्या मातीत जन्मलेल्या या सुपुत्राने आपल्या कतृत्वाचा जो वेल विस्तारला, तो आज संपूर्ण अकोले तालुक्यासाठी अभिमानाचा विषय ठरला आहे.शिक्षणाची पायरीः निमगाव पागा ते अकोले वैद्य सरांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात निमगाव पागा येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतून झाली. आत्याकडे राहून न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पाचवीचे शिक्षण घेतानाच त्यांच्यात जिद्द आणि चिकाटीचे बीज रोवले गेले. पुढील माध्यमिक शिक्षण अगस्ति विद्यालय, अकोले आणि उच्च माध्यमिक व पदवी शिक्षण अकोले महाविद्यालय येथे पूर्ण झाले.

# मोतीलालजी फिरोदिया बुद्धिबळ स्पर्धेत पाचव्या फेरीस उत्साहात प्रारंभ

## मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुले बुद्धिबळ स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी पाचव्या फेरीचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी () पल्लवी विजयवंशी यांच्यासह रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव याच्या हस्ते बुद्धिबळ पटावर चाल देऊन शुभारंभ करण्यात आला यावेळी संघटनेचे सचिव यशवंत बापट, राष्ट्रवादीचे भिंगार शहर अध्यक्ष संजय सपकाळ, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, पंच प्रवीण ठाकरे, देवेंद्र ढोकळे आदिसह खेळाडू, पालक आणि बुद्धिबळप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी म्हणाल्या की, ''बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून बुद्धीला चालना देणारा आणि व्यक्तिमत्त्व घडवणारा खेळ आहे. या खेळामुळे निर्णयक्षमता, संयम, एकाग्रता आणि आत्मविश्वास वाढतो. जीवनात पुढे जाण्यासाठी जिद्द आणि योग्य नियोजन जितके महत्त्वाचे आहे, तितकेच बुद्धिबळात प्रत्येक चाल महत्त्वाची असते.''

त्या पुढे म्हणाल्या, ''या खेळामध्ये त्याची हार होते जो हार मानतो आणि विजय त्याचाच होतो जो विजयाचा निश्चय करतो. त्यामुळे प्रत्येक खेळाडूने सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि जिंकण्याची जिद्द ठेवून खेळावे. पराभवातून शिकण्याची तयारी ठेवली तर यश नक्की मिळते.''

खेळाडूंना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, ''आजच्या तरुण पिढीमध्ये बुद्धिबळाविषयी वाढणारी आवड ही अभिमानाची बाब आहे. अशा स्पर्धांमधून भविष्यात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू तसेच ग्रँडमास्टर घडतील, असा विश्वास आहे.''

स्पर्धेमध्ये देशभरातून आलेल्या खेळाडूंमध्ये चुरशीचे सामने रंगत असून प्रत्येक पटावर विजयासाठी रणनीती आखली जात आहे. स्पर्धेमुळे अहिल्यानगरमध्ये बुद्धिबळाचा उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाला आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे सर यांनी केले तर आभार खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी मानले.

# महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी घरी शिवणकाम देणार - रूपाली करांडे

## राही फाऊंडेशनचा महिला सक्षमीकरणाचा उपक्रम
## प्रशिक्षणानंतर घरोघरी मिळणार शिवणकामचे रोजगार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी राही फाऊंडेशनच्या माध्यमातून शिवणकामचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. घरच्या घरी पाचशे महिलांना रोजगार देणार असल्याचे प्रतिपादन राही फाऊंडेशनच्या संचालिका रूपाली करांडे यांनी केले.

महिला स्वयंरोजगार प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी राही फाऊंडेशनच्या संचालिका करांडे बोलत होत्या. यावेळी जय युवा अकॅडमीचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, भाऊसाहेब पादीर, उडान संस्थेचे अध्यक्षा ॲड. आरती शिंदे, गौरी बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा गीता टेमक, अंगणवाडी सेविका शोभा मोढवे, राही फाऊंडेशनचे संचालक निलेश गर्जे आदी उपस्थित होते.

पुढे करांडे म्हणाल्या की, कौशल्य विषयक फक्त प्रशिक्षण घेऊन उपयोग नाही, तर त्या प्रशिक्षणाचा उपयोग भविष्यात स्वयंरोजगार सुरू करता आला पाहिजे. गरजू महिलांच्या हाताला काम पाहिजे म्हणूनच राही फाऊंडेशनने हा प्रकल्प हाती घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

ॲड. महेश शिंदे म्हणाले की, कौशल्य विकास प्रशिक्षणामधून स्वयंरोजगार ही काळाची गरज आहे. सध्याच्या महागाईच्या काळात बेरोजगारीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यावर मात करून महिला सक्षम करण्यासाठी राही फाऊंडेशन महिलांना प्रत्यक्ष घर बसल्या शिवणकाम देऊन स्वयंरोजगारीत करण्यासाठी हा प्रकल्प राबवित असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणासाठी बुरुडगाव, आदर्श गाव मांजरसुंबा येथे महिलांची बैठक घेण्यात आली. यावेळी युवती व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला. याप्रसंगी पिशव्या, टॉप, शाळेचे गणवेश आणि विविध वस्तू शिवणासाठी देण्यात येणार असल्याचे रूपाली करांडे यांनी सांगितले.

यावेळी शोभा मोढवे, श्वेता गायकवाड, आशा साबळे, प्रिया कुलट, सविता ससाणे, संगीता घोडके, वसुधा नरसाळे, अनिता घोडके, कोमल निमसे, अमृता शिंदे, नंदा शिंदे, प्रियंका खंदारे, सोनल काळे, हिरा रोडे, स्वाती लांगोरे, पुनम मोढवे, मोहिनी कुलाळ, मीनाक्षी कदम, जयश्री वाघमारे, ज्योती वाघमारे, योगिता कदम, शुभांगी वैराळ, रेखा कदम, अश्विनी दांगट, अश्विनी कदम, रूपाली शिंदे, प्राजक्ता कदम, उज्वला वाघमारे, शीतल जगधने, कांचन वाघमारे, वैशाली वाघमारे, सायली कदम, कोमल वाघमारे, योगिता कदम, हिना शेख, गुलनाज शेख आदींसह मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती. महिलांनी शिवणकामाच्या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी राही फाऊंडेशन ९९२१७६५३५३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# वाई साहित्य संमेलनात दुमदुमणार बाळासाहेब देशमुख यांचा कथाकथन कार्यक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** कवी सरकार इंगळी आयोजित, २९ वे ग्रामीण साहित्य संमेलन, वाई येथे दिनांक ०७ जून २६ रोजी संपन्न होत आहे. साहित्य संमेलनाध्यक्ष म्हणून प्रसिद्ध साहित्यिक ,कवी नागनाथ डोलारे यांची निवड झालेली आहे.

सदर संमेलनात कवी संमेलन, कथाकथन, व्याख्यान ,राज्यस्तरीय पुरस्कार अशा कार्यक्रमाचा समावेश आहे. सदर संमेलनात कथाकथन कार्यक्रमासाठी, कथालेखक बाळासाहेब देशमुख यांची निवड झाल्याची माहिती, स्वाभिमानी वाचन मंदिर अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक, कवी विलास पाटील यांनी दिली आहे. सदर संमेलनमध्ये बाळासाहेब देशमुख हे अबोली. ही आजी आजोबा व नातवंडे यांचे भावविश्व कथा सादर करणार आहेत.

आजवर कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचे अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ५०० प्रयोग शाळा, कॉलेज, सभागृह, जेष्ठ नागरिक संघ, उन्हाळी शिबिर यामध्ये संपन्न झालेले असून, राज्यस्तरावर महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यात, २८ कार्यक्रम पूर्ण झालेले आहेत. त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध असून त्यांच्या रंग माझा वेगळा.. या कथासंग्रहास ,अखिल भारतीय साहित्य परिषद पुणे व संस्कृती वाचन प्रतिष्ठान श्रीरामपूर या संस्थेचे राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेले आहेत.

# बंदुकीचा धाक दाखवत तरुणावर जीवघेणा हल्ला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाथर्डी तालुक्यातील शेवगाव रोड परिसरात एका तरुणाला बंदुकीने जीवे मारण्याची धमकी देत नऊ जणांच्या टोळीने कुऱ्हाडीचे दांडे, काठ्या व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि. २५ मे) दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, गंभीर स्वरूपाच्या या घटनेतील आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती लागले नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



या हल्ल्यात तुषार चव्हाण हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी शुभांगी साईनाथ चव्हाण (वय २०, रा. शेवगाव रोड, पाथर्डी) यांनी पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, शुभांगी चव्हाण या त्यांच्या आई व आजीसोबत राहतात. रविवारी दुपारी त्या शेवगाव रोडवरील हॉटेल मधुबनजवळ असलेल्या समर्थ किराणा दुकानातून किराणा घेऊन बाहेर आल्या असता, पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून काही जण तेथे आले. त्यामध्ये पप्पू लाल्या भोसले, गुंग्या लाल्या भोसले, विशाल हंबड्या काळे, गुड्डी हंबड्या काळे (सर्व रा. बाभळगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर), तसेच प्रल्हाद गहिनीनाथ मुरकुटे (रा. आष्टी, जि. बीड) आणि इतर तीन ते चार अनोळखी इसमांचा समावेश होता.

आरोपींनी शुभांगी चव्हाण यांना जबरदस्तीने ओढून नेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांना वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या तुषार चव्हाण याच्यावर आरोपींनी कुऱ्हाडीच्या लाकडी दांडक्याने डोक्यात वार करून गंभीर जखमी केले. तसेच इतर आरोपींनी तुषार व शुभांगी यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी आरोपींनी बंदुकीचा धाक दाखवत ''जीव मारून टाकू'' अशी धमकी दिली. तसेच शुभांगी चव्हाण यांना ''तुला किडनॅप करून विकून टाकतो,'' अशी धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.घटनेनंतर जखमी तुषार चव्हाण यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पाथर्डी येथे दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# विधान परिषदेचे नवनियुक्त आमदार विवेकजी कोल्हे यांचा शिक्षक भारती संघटनेतर्फे ऐतिहासिक सन्मान!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शिक्षण आणि शिक्षकांच्या हितासाठी सतत आग्रही भूमिका घेणारे, आणि अहोरात्र कष्ट करणारे, विधान परिषदेचे नवनियुक्त आमदार, सन्माननीय विवेकजी कोल्हे साहेब यांचा शिक्षक भारती संघटना अहिल्यानगर यांच्या वतीने एका भव्य आणि गरिमामय समारंभात भावपूर्ण सन्मान करण्यात आला. या सन्मानाने शिक्षणक्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला असून, शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांना एक प्रबळ नेतृत्व मिळाल्याची भावना शिक्षक भारती संघटनेचे कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी व्यक्त केली. आमदार विवेकजी कोल्हे साहेबांना शाल व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी, कोल्हे साहेब यांचा गौरव करण्यात आला, जो त्यांच्या कार्याची पावती आणि समाजाप्रती असलेल्या श्रद्धेचे प्रतीक ठरला.

या ऐतिहासिक प्रसंगी प्रमुख मान्यवर उपस्थित होते, ज्यात शिक्षणक्षेत्रातील अनुभवी आणि प्रतिभावान व्यक्तिमत्त्वांचा समावेश होता :

महेश पाडेकर (पुणे विभाग कार्याध्यक्ष, शिक्षक भारती संघटना): त्यांनी कोल्हे साहेबांच्या कार्याचे कौतुक केले आणि त्यांच्या नेतृत्वामुळे शिक्षकांचे प्रश्न मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त केला,अतुलजी कोताडे (संचालक, माध्यमिक शिक्षक सोसायटी अहिल्यानगर): त्यांनी कोल्हे साहेबांना शिक्षणक्षेत्रातील प्रश्नांची जाण असून, ते विधान परिषदेत शिक्षकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडतील, असा दावा केला.सन्माननीय संपत वाळके (अकोले तालुका अध्यक्ष, शिक्षक भारती संघटना): त्यांनी कोल्हे साहेबांच्या विजयामुळे तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असल्याची भावना व्यक्त केली.प्रवीण मालुंजकर (मार्गदर्शक): त्यांनी कोल्हे साहेबांना शिक्षणक्षेत्रात सुधारणा करण्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. अरुण कदम, किरण शिंदे, गोरख देवकर, दुर्गा गाडे आणि इतर अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार विवेकजी कोल्हे साहेबांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, ''मला मिळालेला हा सन्मान हा माझा नसून, संपूर्ण शिक्षक समाजाचा आहे. शिक्षण हे समाजाचे भविष्य आहे, आणि शिक्षक हे राष्ट्रउभारणीचे मुख्य आधारस्तंभ आहेत. मी विधान परिषदेत शिक्षकांचे सर्व प्रलंबित प्रश्न मांडण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव कटिबद्ध राहीन. माझ्याकडून जितकी मदत शक्य आहे, तितकी मी पूर्णपणे करेन.


शिक्षक भारती संघटनेचे त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणक्षेत्राचा विकास होईल, अशी आशा व्यक्त केली. हा सन्मान सोहळा केवळ एक औपचारिकता नव्हता, तर शिक्षकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी, त्यांच्या भावना समजून घेण्यासाठी, आणि एकत्र येऊन एक नवीन पहाट घडवण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरले. या कार्यक्रमात उपस्थित शिक्षक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये एक नवी ऊर्जा आणि उत्साह संचारला.

हा कार्यक्रम समाजासाठी एक महत्त्वाचा संदेश घेऊन आला. शिक्षणक्षेत्राच्या विकासासाठी एकत्र येण्याची, शिक्षकांचे प्रश्न समजून घेण्याची, आणि एक नवीन पहाट घडवण्यासाठी कटिबद्ध राहण्याची गरज अधोरेखित केली.

या बातमीमुळे शिक्षकांमध्ये एक नवी आशा निर्माण होईल, त्यांना नवीन ऊर्जा मिळेल, आणि ते त्यांच्या कार्याकडे अधिक जोमाने लक्ष देतील. समाजात शिक्षणक्षेत्राचे महत्त्व वाढेल, आणि शिक्षकांविषयी अधिक आपुलकी आणि आदर निर्माण होईल.

# अहिल्यानगर लीग चॅम्पियनशिप २०२५-२६ फुटबॉल लीगचा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन () आयोजित अहिल्यानगर लीग चॅम्पियनशिप २०२५-२६ चा लीग टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला. जिल्ह्यातील एकूण १२ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला. अहमदनगर क्लब शेजारील भुईकोट किल्ला मैदान येथे १८ दिवस चाललेल्या या स्पर्धेत एकूण ३६ सामने खेळविण्यात आले. सर्व संघांनी उत्कृष्ट खेळभावना आणि स्पर्धात्मक फुटबॉलचे दर्शन घडविले.

लीग फेरीअंती पुढील संघांनी सुपर लीगसाठी पात्रता मिळविली. पूल फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल क्लब, बाटा फुटबॉल क्लब

पूल सुमन एंटरप्रायझेस फुटबॉल क्लब, गुलमोहर फुटबॉल क्लब सुपर लीग सामने ३० जून पासून सुरू होणार असून, २ जुलै रोजी होणारा अंतिम सुपर लीग सामना अहिल्यानगर लीग चॅम्पियनशिप विजेता निश्चित करणार आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन सर्व सहभागी संघ खेळाडू प्रशिक्षक फुटबॉलप्रेमी यांचे आभार मानले आहे.

स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल संयुक्त सचिव व्हिक्टर जोसेफ व कार्यकारिणी सदस्य झेवियर स्वामी तसेच अभय साळवे, अभिषेक सोनवणे, सचिन पात्रे, वैभव मनोदिया आणि राजेश अँथनी यांचे असोसिएशनतर्फे विशेष कौतुक करण्यात आले.

स्पर्धेतील सर्व सामने यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल फुटबॉल असोसिएशन रेफरी पॅनेलचेही विशेष आभार मानण्यात आले. या पॅनेलमध्ये जॉय जोसेफ, प्रकाश कनोजिया, वैभव मनोदिया, शशांक वाल्मिकी, अक्षय बोराडे, रितेश रणमाळे, महेश पाटेकर, अभिषेक सोनवणे, अभय साळवे, जॉय शेळके, सुमित कुमारसिंह, भूषण गवळी, प्रियंका अवारे, सोनिया दोसानी, पूजा भिंगारदिवे, आणि मनीष कुमार सिंह यांचा समावेश होता. अहिल्यानगरमधील फुटबॉलप्रेमींनी सुपर लीगच्या रोमांचक सामन्यांना उपस्थित राहावे असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ※संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### ‘नेत्रदूत’ जालिंदर बोरुडे यांचा कृषी उत्पन्न बाजार समितीकडून सन्मान



अहिल्यानगर - सामाजिक कार्यकर्ते तथा ‘नेत्रदूत’ जालिंदर बोरुडे यांना पुणे येथील आनंदी युनिव्हर्सल फाऊंडेशनच्या वतीने प्रदान करण्यात आलेल्या राष्ट्रीय गौरव पुरस्काराबद्दल कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्हाईस चेअरमन रभाजी सुळ आणि संचालक भाऊसाहेब ठोंबे यांच्या हस्ते जालिंदर बोरुडे यांचा सत्कार करण्यात आला.व्हाईस चेअरमन रभाजी सुळ म्हणाले की, ‘‘जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने नेत्रसेवा करत हजारो लोकांना नवदृष्टी दिली आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने गरजूंना नवसंजीवनी ठरत आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी अशा प्रकारे सातत्याने काम करणारे व्यक्तिमत्व अत्यंत दुर्मिळ असते. त्यांच्या कार्याचा प्रत्येकाला अभिमान वाटावा असे सामाजिक कार्य त्यांनी उभे केले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन युवकांनी समाजसेवेकडे वळावे आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे त्यांनी आवाहन केले. सत्काराला उत्तर देताना जालिंदर बोरुडे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, ‘‘हा सन्मान माझ्यासाठी अधिक जबाबदारी वाढवणारा आहे. गेल्या ३४ वर्षांपासून मी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून नेत्रसेवा करत आहे. अनेक गरजू रुग्णांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करून नवदृष्टी देण्याचे कार्य आम्ही सातत्याने करत आलो आहोत. समाजातील लोकांचे प्रेम आणि सहकार्य यामुळेच हे कार्य शक्य झाले आहे. पुढील काळातही अधिक जोमाने ही समाजसेवा सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### निमगाव वाघात बकरी ईदला धार्मिक ऐक्याचे दर्शन

अहिल्यानगर - निमगाव वाघा (ता. नगर) येथे बकरी ईद (ईद उल अजहा) उत्साहात साजरी करण्यात आली. ईद निमित्त हिंदू बांधवांनी गावातील मुस्लिम समाजाला शुभेच्छा देऊन धार्मिक ऐक्याचे दर्शन घडविले. गावात सकाळी मुस्लिम बांधवांनी ईदची नमाज पठण करुन गावाच्या सुख, शांती व समृध्दीसाठी प्रार्थना केली. श्री नवनाथ युवा मंडळ, स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, चाँदभाई शेख, नवाबभाई शेख, नासिर भाई शेख, आबिद शेख, जावेद शेख, ताजमोहम्मद शेख, हुसेन शेख, नईम सय्यद, बस्तार सय्यद, रज्जाक शेख, रऊफ शेख, उस्मान शेख, हबीब शेख, आसिफ शेख, आदम शेख, बन्शीभाई शेख, सत्तार शेख, सादिक शेख, नामदेव फलके आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. सकाळी ९ वाजता गावात ईदची नमाज मौलाना हुजेब यांच्या मार्गदर्शनाखाली पठण करण्यात आली. पै.नाना डोंगरे म्हणाले की, पुरोगामी महाराष्ट्रात सर्व धर्मिय गुण्यागोविंदाने नादतात, ही आपल्या भारतीय संस्कृतीची ओळख आहे. सर्व हिंदू-मुस्लिम समाज बांधव एकमेकांच्या सण-उत्सवात सहभागी होत असतात. सुफी-संतांच्या पावन भूमीत जात, धर्म व पंथाचा भेदभाव होत नाही. माणुसकी हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी सांगितले.

# कोळसांगवीत रस्ताकामी महीला ग्रामस्थ आक्रमक अमरण सामुहीक उपोषणाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यातील कोळसांगवी ते जिरेवाडी रस्ता डांबरीकरण नाणीनदीवरील पुलासह व्हावा आशि मागणी कोळसांगवी महीला व ग्रामस्थांनी निवेदन देत सोमवार दि १ जुन रोजी उमरण उपोषणाचा इशारा दिला आहे सदर निवेदन सार्वजनीक बांधकाम विभाग पाथर्डी प्रांताधिकारी पाथर्डी तहसिलदार पाथर्डी पोलीस स्टेशन पाथर्डी यांना रस्ता होणे कामी अमरण उपोषणाचा निवेदनाद्वारे इशारा दिला आहे.





सविस्तर वृत्त अले की मौजे कोळसांगवी ते जिरेवाडी रस्ता पावसाळ्यात पाई चालणे सुद्धा योग्य राहत नाही नाणी नदीवरील पुल नसल्या कारनाने कोळसांगवी ते जिरेवाडी संपर्क तुटतो शालेय विद्यार्थी शिक्षणापासुन वंचीत राहतात अंत्यविधिसाठी स्मशानभुमिचा आणि गावाचा संपर्क तुटतो नदि शेजारील ग्रामस्थ संपर्क तुटत असल्या कारनाने सर्वं सुविधेपासुन वंचित राहतात या समस्या संदर्भात महिला सरपंचासह महिला ग्रामस्थ आक्रमक होत प्रशासनास निवेदन देत अमरण उपोषणाचा इशारा दिला.

तात्काळ रस्ता व पुल होणे अत्यंत गरजेचे आहे आम्ही वेळोवेळी लोकप्रतिनिधीचे निवेदनाद्वारे लक्ष वेधले मात्र पदरी निराशा पडली आता तात्काळ नाणीनदी पुलासह रस्ता अन्यथा सामुहीक अमरण उपोषण सोमवार दि. १ जुन पासुन सुरु राहणार असा इशारा दिला आहे सुरक्षित प्रवास आमचा हक्क शेतकऱ्यांचा विकासाचा मार्ग विद्यार्थांचा शिक्षणाचा आधार रुग्णवाहीका व आपत्कालीन सेवांसाठी जिवनदाई मार्ग आमचा संघर्ष विकासासाठी आमचे उपोषण मार्ग हक्कासाठी रस्ता आणि पुल आमचा हक्काचा अभिकार एकजुट आमची ताकद अशा मजकुराचे बॅनर सोशल मिडीयावर व्हायरल होत आहेत.

# अज्ञात व्यक्तीकडून सौरऊर्जा प्लेटचे नुकसान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**खरवंडी कासार–** पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार येथिल रहवाशी शेतकरी गणपत देवराव जगताप लाभार्थी क्रमांक -४४२०८००२६५१९० यांना मागेल त्याला सौरऊर्जा पंप योजने अंर्तगत ७.५ एचपी नुकताच विहीरीवर बसवण्यात आला असुन अज्ञात व्यक्तीने दगड मारून एक सौरऊर्जा सोलर प्लेट फोडली सदर घटना गुरुवार दि.२८ मे २०२६ रोजी निदर्शनास आली चालु सौरऊर्जा पंप बंद होण्याच्या अवस्थेत आला आहे पावसाळ्याचे दिवस जवळ आले आहेत सौरऊर्जा प्लेटची काच फुटल्याने प्लेट मध्ये पाणी जाऊन शॉर्टसर्किट होण्याची भिती निर्माण झाली आहे सदर पंप स्पॅन कंपनीचा असुन देखभाल दुरुस्ती विमा संवंरक्षण पाच वर्ष आहे स्पॅन सोलर पंप



कंपनीचे समन्वयक अक्षय सोमनाथ अंदुरे यांना कल्पना दिली आहे.

# जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर काजल खामकर यांची मुंबई पोलिसात निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** टाकळी ढोकेश्वर परिसरातील काजल मच्छिंद्र खामकर यांची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याने टाकळी ढोकेश्वर तसेच खामकर झाप येथे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सासर आणि माहेर या दोन्ही ठिकाणी कुटुंबीयांकडून आनंद व्यक्त करण्यात येत असून परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

काजल या शिवनाथ गोरडे यांच्या कन्या असून अत्यंत प्रतिकूल आणि बिकट आर्थिक परिस्थितीतही त्यांनी जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर हे यश



संपादन केले आहे. अनेक अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या ध्येयाप्रती सातत्य ठेवले आणि अखेर मुंबई पोलीस दलात निवड होण्याचा मान मिळवला.

त्यांच्या या यशामागे पती मच्छिंद्र खामकर यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि खंबीर साथ लाभली. मच्छिंद्र खामकर हे प्लंबिंग व्यवसाय करत असून प्रामाणिक, जिज्ञासू आणि मेहनती व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात ओळखले जातात. खडतर परिस्थितीतही पत्नीच्या स्वप्नांना बळ देत त्यांनी काजल यांना या यशापर्यंत पोहोचवण्यासाठी मोठे योगदान दिले. तसेच पत्रकार संतोष कोरडे यांच्या त्या मेहुणी असल्याने कोरडे परिवारातूनही आनंद व्यक्त करण्यात येत असून नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. काजल खामकर यांच्या यशामुळे टाकळी ढोकेश्वर परिसरातील युवक-युवतींसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण झाला असून सर्व स्तरातून त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

# विविध प्रकारच्या प्रसार माध्यमांमध्ये,वृतपत्र क्षेत्रात कार्यरत प्रेरणादायी अशा व्यक्तिमत्त्वांची दखल

## आजपर्यंन्तच्या वाटचालीवर प्रकाश टाकणारे, स्फुर्तिदायक असे ‘संवादभूषण’ हे पुस्तक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** निवृत्त माहिती संचालक व न्युज स्टोरी टुडे या जागतिक पातळीवरील पोर्टलचे निर्माते देवेंद्र भुजबळ यांनी नुकतेच प्रकाशित केले आहे. या पुस्तकात ३४ प्रेरणादायी व्यक्तीमत्वांचा समावेश असुन या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण आणि इतर मान्यवरांच्या हस्ते नुकतेच लोणावळा येथे संपन्न झाले. या पुस्तकात अहिल्यानगर येथील ज्येष्ठ वृतछायाचित्रकार अनिल विनोद शाह यांचाही आजपर्यंन्तच्या वृत छायाचित्रण क्षेत्रातील कार्याचा समावेश झाला असून अहिल्या नगरवासियांनसाठी ही अभिमानास्पद बाब आहे.

शाह परिवार गेल्या चार पिढ्या नपासुन छायाचित्रण क्षेत्रात कार्यरत आहे. त्यामुळे अनिल शाह यांच्यावरील लेखात आजोबा गुलाबचंदजी, वडील विनोद शाह,भाऊ प्रमोद,दिपक उदय व सुनिल व आता काही भावाची मुले या छायाचित्रण क्षेत्रात कार्यरत आहेत चार पिढ्यांचे या. पुस्तकात नगर जिल्हय़ाच्या जडणघडणीत असलेले योगदान देखील अधोरेखित करण्यात आले आहे. शहा परिवाराने आपल्या छायाचित्रण तसेच वृत छायाचित्रण क्षेत्रातील आपल्या वाटचालीतून स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.ती अनिल आजही जपत आहे.

केवळ नगर जिल्ह्यातीलच नाही तर महाराष्ट्र राज्यातील ज्येष्ठ व अनुभवी वृतछायाचित्रकारत त्यांची गणना अभिमानाने केली जाते.नगर जिल्ह्यातील प्रत्येक क्षेत्रातील संस्कृतिक, धार्मिक,शैक्षणिक, सामाजिक,विविध राजकारण परिस्थितींचा, विकासात्मक




संस्थांचा,औद्योगिकरणच्या प्रगती पथावरील वाटचालीचे ते साक्षीदार असुन विशेष प्रसंगातील जुन्या काही छायाचित्रांचा खजिना आज शहा परिवाराकडे आहे.निसर्ग चित्रणासह विविध कलात्मक,समयोसुचित, प्रसंगानुरूप, प्रभावी, परिणामकारक छायाचित्र टिपण्याच्या विशेष शैलीची दखल घेत अनिल शाह यांना राज्य, राष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रतिष्ठित पुरस्कार देऊन आजपर्यन्त गौरविण्यात आले आहे. या सर्वांची नोंद ज्येष्ठ लेखक देवेंद्र भुजबळ यांनी आपल्या लेखात घेतली आहे.

# राहत्या जागेतून हाकलण्याचा प्रयत्न पोलीस संरक्षणाची मागणी

## एकलव्य भिल्ल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पाथर्डी तालुक्यातील बडेवडगाव येथील दशरथ साळूराम खवले यांना राहत असलेल्या जागेतून जबरदस्तीने हाकलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला असून संबंधितांकडून वारंवार धमक्या दिल्या जात असल्याने पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत एकलव्य भिल्ल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



दशरथ खवले हे मौजे बेल पारा येथे मागील ४० ते ४५ वर्षांपासून वास्तव्यास आहेत. मजुरी, खड्डे खोदकाम व इतर श्रमाची कामे करून ते उदरनिर्वाह करतात. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, सुमारे ४० ते ४५ वर्षांपूर्वी सदर जागेत राहण्यासाठी त्यांनी सोमनाथ पांगरे यांना २० ते ३० हजार रुपये दिले होते. त्यानंतर ते सातत्याने त्या ठिकाणी वास्तव्यास आहेत.

दरम्यान, सोमनाथ आश्रुबा पांगरे, आशाबाई सोमनाथ पांगरे व जनार्धन सोमनाथ पांगरे हे वारंवार जागा खाली करण्यासाठी दबाव टाकत असल्याचा आरोप खवले यांनी केला आहे. संबंधित व्यक्तींकडून शिवीगाळ, दमदाटी तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

खवले यांनी पुढे म्हटले आहे की, संबंधितांनी बुलडोझर लावून त्यांच्या राहत्या घराचे छप्पर पाडले तसेच ये-जा करण्याच्या रस्त्यावर काटे टाकून त्रास दिला. कोणतीही नोटीस अथवा कायदेशीर कागदपत्रे न देता अचानक जागा खाली करण्यासाठी दबाव आणला जात आहे. गेल्या दहा ते बारा दिवसांपासून फोनवरूनही धमक्या दिल्या जात असून, ‘‘जागा मोकळी करा अन्यथा जिवंत सोडणार नाही,’’ अशी धमकी दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

मी गरीब, अशिक्षित व मजुरी करून उदरनिर्वाह करणारा मागासवर्गीय वडारी समाजातील नागरिक असल्याने मला बेघर करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही खवले यांनी म्हटले आहे. संबंधितांकडून कधीही मारहाण अथवा जबरदस्तीने घर खाली करण्याचा प्रयत्न होऊ शकतो, त्यामुळे जीवितास धोका निर्माण झाल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी तसेच पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

हे निवेदन एकलव्य भिल्ल संघटनेचे संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजंता गोलवाड व नाशिक सभापती शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले. यावेळी अनिता पवार, शोभा पवार, अनिल पवार आदी उपस्थित होते.

# न्यायप्रविष्ट जागेवरील शाळेची तोडफोड; संस्थाचालक महिलेची पोलिसांकडे धाव

## टाकळी खातगाव येथील समता शैक्षणिक संस्थेतील शाळा पाडल्याचा आरोप; जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याची तक्रार

## ११ वर्षांपासून सुरू असलेल्या शाळेवर अचानक कारवाई; १०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील टाकळी खातगाव येथील समता शैक्षणिक संस्थेच्या शाळेची न्यायालयीन वाद प्रलंबित असताना बेकायदेशीरपणे तोडफोड व जाळपोळ करण्यात आल्याचा गंभीर आरोप संस्थाचालक शकिरा रमजान शेख यांनी केला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाणे तसेच जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून, पोलिसांनी अद्याप गुन्हा नोंदविला नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

तक्रारदार शकिरा शेख यांनी दिलेल्या माहितीनुसार, टाकळी खातगाव येथील गट क्रमांक ३९/१ मधील सुमारे ३२ गुंठे जागेत मागील ११ वर्षांपासून समता शैक्षणिक संस्था कार्यरत आहे. या ठिकाणी पहिली ते बारावीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात १०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी ही संस्था शिक्षणाचे केंद्र बनली आहे.

तक्रारीनुसार, दिनांक ११ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास संबंधित गैरतक्रारदारांनी नियोजनपूर्वक शाळेवर धाड टाकून पत्र्याचे शेड, बांधकाम व इतर साहित्याची तोडफोड केली. शाळेमध्ये कोणी नसताना ही कारवाई करण्यात आली. शेजारील व्यक्तीने माहिती दिल्यानंतर तक्रारदार घटनास्थळी पोहोचले असता संबंधित मंडळी शाळा पाडत असल्याचे दिसून आले. यावेळी संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ फुटेज तसेच जाळपोळीचे दृश्य रेकॉर्ड करण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.



तसेच, शाळा व जागेवरून सुरू असलेला वाद न्यायालयात प्रलंबित असताना कोणत्याही न्यायालयीन आदेशाशिवाय जमाव जमवून जबरदस्तीने शाळेचे नुकसान करण्यात आले. विरोध करण्यासाठी गेलेल्या तक्रारदार महिला व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करून जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित जागा त्यांनी सन २०१५ मध्ये नोंदणीकृत खरेदीखताद्वारे विकत घेतली होती. अहमदनगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त क्रमांक ३१८५/२०१५ व ३८५०/२०१५ अन्वये व्यवहार पूर्ण झाला होता. खरेदीखतानंतर जागेचा ताबाही देण्यात आला होता. त्यानंतर शाळेचे बांधकाम करून संस्था सुरू करण्यात आली. मात्र, नंतर जमीन व्यवहारावरून काही नातेवाईकांनी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता.

या प्रकरणात अहमदनगर येथील न्यायालयाने २०१९ मध्ये एकतर्फी आदेश दिल्यानंतर तक्रारदारांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले असून ते अद्याप प्रलंबित आहे. तसेच संबंधित जागेबाबत उपविभागीय अधिकारी कार्यालयातही अपील सुरू असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांनी आरोप केला आहे की, न्यायालयीन प्रक्रिया सुरू असतानाही महसूल अधिकाऱ्यांची दिशाभूल करून फेरफार रद्द करण्याचे आदेश मिळविण्यात आले. त्यानंतर काही व्यक्तींनी संगनमत करून जागेवर अतिक्रमण करण्याचा व शाळा उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. ‘‘आम्ही पुन्हा येऊ आणि जागा मोकळी करून ताबा घेऊ, पोलिस व कायद्याला घाबरत नाही,’’ अशी धमकी संबंधितांनी दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे स्वतःच्या जीवितासह कुटुंबाच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचे शकिरा शेख यांनी म्हटले आहे.

दरम्यान, जून महिन्यात नवीन शैक्षणिक सत्र सुरू होणार असल्याने शाळेचे मोठे नुकसान झाल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण अडचणीत येणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे संबंधित दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

‘वाद न्यायालयात असताना थेट तोडफोड’

न्यायालयीन आदेशाशिवाय कारवाई केल्याचा आरोप; महिला संस्थाचालक भयभीततक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित जागेचा वाद न्यायालयात प्रलंबित असताना कोणालाही स्वतःहून ताबा घेण्याचा किंवा तोडफोड करण्याचा अधिकार नाही. तरीदेखील संबंधितांनी बेकायदेशीरपणे जमाव जमवून शाळेचे नुकसान केले. यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून संरक्षण द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

१०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर संकट

ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून, पालकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. समता शैक्षणिक संस्थेमध्ये परिसरातील अनेक गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेची तोडफोड झाल्याने येत्या शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांचे वर्ग कुठे भरवायचे, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शिक्षण विभाग व प्रशासनानेही याकडे लक्ष देण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहीम २८ जून रोजी; महानगरपालिका स्तरीय कृती दलाची बैठक

## शेवटच्या घटकातील बालकापर्यंत पल्स पोलिओचा डोस पोहोचविण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणार – उपायुक्त मेहर लहारे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय पल्स पोलिओ निर्मूलन मोहिमेअंतर्गत रविवार, दिनांक २८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत शून्य ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यात येणार असल्याची माहिती अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त मेहर लहारे यांनी दिली. शहरातील एकही बालक पल्स पोलिओच्या डोसपासून वंचित राहणार नाही, यासाठी प्रशासनामार्फत व्यापक नियोजन करण्यात आले असून शेवटच्या घटकातील बालकापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका स्तरीय कृती दलाची नियोजन बैठक उपायुक्त मेहर लहारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विविध विभागांच्या समन्वयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, शिक्षण अधिकारी पठाण सर, डॉ. दिलीप बागल, डॉ. वृषाली आरु, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगरचे माजी अध्यक्ष सुनील कटारिया, डॉ. उज्वला शिरसाट, डॉ. रणजीत सत्रे, डॉ. समीर होळकर, जायंटस ग्रुप ऑफ अहिल्यानगरचे संजय गुगळे, प्रतिभा राऊत, सुमित जाधव, शिल्पा ठोंबरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपायुक्त मेहर लहारे म्हणाले की, पोलिओमुक्त भारताचे उद्दिष्ट कायम राखण्यासाठी प्रत्येक बालकापर्यंत पल्स पोलिओचा डोस पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी महानगरपालिका, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांच्या समन्वयातून प्रभावी जनजागृती मोहिम राबविण्यात येणार आहे. शहरातील सर्व पोलिओ बूथ, फिरती पथके आणि विशेष मोहिमांद्वारे लाभार्थी बालकांपर्यंत पोहोचण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले की, राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम ही बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मोहीम आहे. महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत शहरातील सर्व पोलिओ बूथचे नियोजन पूर्ण करण्यात आले असून आरोग्य कर्मचारी, आशा सेविका व स्वयंसेवकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. शहरातील एकही बालक पल्स पोलिओच्या डोसपासून वंचित राहू नये यासाठी विशेष भर दिला जाणार आहे. पालकांनी आपल्या पाच वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओचा डोस देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. वृषाली आरु यांनी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेबाबत सविस्तर माहिती देत मोहिमेचे स्वरूप, लाभार्थी बालकांची संख्या, पोलिओ बूथचे नियोजन, आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती, जनजागृती उपक्रम तसेच विशेष पथकांच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन केले. प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील बालकाला पोलिओचा डोस देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

बैठकीत उपस्थित विविध विभागांच्या प्रतिनिधींनी मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक सूचना मांडल्या. शहरातील सर्व शाळा, अंगणवाडी केंद्रे, आरोग्य केंद्रे, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक संघटनांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करून राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम शंभर टक्के यशस्वी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# इंडियन डेंटल असोसिएशन अहिल्यानगर शाखेची ‘जागतिक तंबाखूमुक्त दिना’निमित्त व्यापक जनजागृती मोहीम

## मौखिक कर्करोग तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ३१ मे रोजी साजरा करण्यात येणाऱ्या ‘जागतिक तंबाखूमुक्त दिना’निमित्त इंडियन डेंटल असोसिएशन () अहिल्यानगर शाखेच्या वतीने तंबाखूविरोधी व्यापक जनजागृती मोहीम तसेच मौखिक कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. वाढत्या तंबाखू सेवनामुळे समाजात निर्माण होत असलेल्या गंभीर आरोग्य समस्यांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून विविध स्तरातून या मोहिमेचे स्वागत करण्यात येत आहे.

आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जीवनशैलीमध्ये तंबाखू, गुटखा, मावा, पानमसाला, सिगारेट, वेपिंग आणि इतर व्यसनाधीन पदार्थांचे सेवन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. विशेषतः युवक, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच अल्पवयीन मुलांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याने सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रात मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन हे केवळ वैयक्तिक आरोग्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबासाठी घातक ठरत आहे. व्यसनामुळे आर्थिक नुकसान, मानसिक तणाव, कौटुंबिक कलह तसेच सामाजिक असुरक्षितता निर्माण होत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. त्यामुळे व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

तंबाखू सेवनामुळे तोंडाचा, घशाचा आणि फुफ्फुसाचा कर्करोग, हृदयविकार, श्वसनाचे आजार, रक्तदाब, दात व हिरड्यांचे गंभीर विकार यांसारख्या अनेक जीवघेण्या आजारांचा धोका वाढत असल्याचे दंततज्ज्ञांनी स्पष्ट केले. विशेषतः गुटखा आणि माव्याच्या सतत सेवनामुळे तोंडातील पेशींमध्ये होणारे बदल पुढे जाऊन मौखिक कर्करोगाला कारणीभूत ठरत असल्याचे सांगण्यात आले.

जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार दरवर्षी जगभरात लाखो लोकांचा मृत्यू तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होत आहे. भारतामध्ये तोंडाचा कर्करोग हा सर्वाधिक आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक असून त्यामागील प्रमुख कारण तंबाखूचे सेवन असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

भारतामध्ये सुमारे ३० टक्के कर्करोग हे तोंडाशी संबंधित असून तोंडाच्या कर्करोगाच्या जवळपास ८० टक्के रुग्णांमध्ये तंबाखू सेवन हे मुख्य कारण असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. ग्रामीण भागात तसेच कामगार वर्गामध्ये गुटखा, तंबाखू आणि सुपारी सेवनाचे प्रमाण अधिक असल्याने आरोग्य धोक्यात येत असल्याची बाबही पुढे आली आहे.

तंबाखू, गुटखा किंवा सुपारीच्या सातत्याने सेवनामुळे तोंडातील आतील त्वचेवर परिणाम होऊन पेशींमध्ये असामान्य बदल होतात. तोंडात न भरणारी जखम, लाल किंवा पांढरे चट्टे, जिभेला जळजळ, तोंड उघडण्यास त्रास, गिळताना अडचण, मानेमध्ये गाठ निर्माण होणे ही मौखिक कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे असू शकतात. ही लक्षणे दिसताच तत्काळ तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले.

वेळेवर निदान झाल्यास तोंडाच्या कर्करोगावर प्रभावी उपचार करणे शक्य होते. त्यामुळे नियमित दंत तपासणी आणि तोंडाची वैद्यकीय तपासणी याकडे दुर्लक्ष करू नये, असेही यावेळी सांगण्यात आले. विशेषतः व्यसनाधीन व्यक्तींनी नियमित तपासणी करून आरोग्य सुरक्षित ठेवावे, असे आवाहन करण्यात आले.

# अहिल्यानगर मनपामध्ये ६९ ऑनलाईन आरटीएस सेवा

## झेंडिगेट येथे मार्गदर्शन कक्षाचे उद्घाटन । नागरिकांना डिजिटल सेवांचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाचा पुढाकार । आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाची अंमलबजावणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या नागरिकांना ऑनलाईन आरटीए‘ सेवा उपलब्ध करून देण्याच्या धोरणाअंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये एकूण ६९ विविध सेवा नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नागरिकांना जलद, पारदर्शक आणि तत्पर सेवा मिळाव्यात तसेच या सेवांबाबत जनजागृती व्हावी या उद्देशाने प्रभाग क्र. ३ झेंडिगेट येथे स्वतंत्र मार्गदर्शन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

या मार्गदर्शन कक्षाचे उद्घाटन महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, अशोक साबळे, सिस्टिम मॅनेजर अंबादास साळी, प्रभाग अधिकारी शाम गोडळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी संगणक विभागातील शेखर बनकर, अनिरुद्ध गायके, अमित म्याना तसेच प्रभाग समितीतील शाम शिंदे, भालेराव, वाडेकर, अर्जुन जाधव यांनी नागरिकांना थेट मोबाईलद्वारे अर्ज भरून देण्यास मदत केली. नागरिकांना सेवांचा वापर कसा करावा, अर्ज प्रक्रिया कशी करावी आणि ऑनलाइन प्रणालीद्वारे कोणत्या सुविधा मिळू शकतात याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात आले.

या वेळी झेंडिगेट परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांना डिजिटल सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात म्हणून प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.

महानगरपालिकेचे आयुक्त श्री. यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून ‘‘आपले सरकार’’ व ‘‘नगर कार्यावली’’ अंतर्गत नागरिकांना घरबसल्या सेवा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत प्रणालीद्वारे नागरिकांना जलद सेवा देणे हा मुख्य उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.


महानगरपालिकेमार्फत नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या ६९ ऑनलाईन सेवांमुळे विविध शासकीय कामकाजासाठी कार्यालयात वारंवार चकरा मारण्याची गरज कमी होणार असून पारदर्शक व गतिमान प्रशासनाची दिशा अधिक मजबूत होणार आहे.

या वेळी प्रशासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले की, त्यांनी जास्तीत जास्त सेवा अधिकृत संकेतस्थळ .. वरून ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात आणि डिजिटल सेवांचा लाभ घ्यावा.

अशा प्रकारे झेंडिगेट येथील मार्गदर्शन कक्ष हा नागरिकांना डिजिटल प्रशासनाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार असून शहरातील इतर भागांमध्येही अशा सुविधा विस्तारण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ग्रामविकास अधिकारी अशोक रोकडे यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**खरवंडी कासार–** कर्तव्यदक्ष, वेळेची तत्परता आणि सर्वसामान्यांचे हित जोपासणारे अधिकारी अशी ओळख असलेले ग्रामविकास अधिकारी अशोक रोकडे हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा भव्य नागरी सत्कार व सेवानिवृत्ती गौरव सोहळा मंगळवार, दिनांक २ जून रोजी पाथर्डी येथील अर्जुना लॉन्स येथे आयोजित करण्यात आला आहे.

मुळगाव दैत्यनांदूर.शेवटची सेवा फुंदे टाकळी आणि खरवंडी कासार येथे सेवानिवृत्त .कार्यक्रम ठिकाण अर्जुना लॉन्स, पाथर्डी मंगळवार, २ जून रोजी सकाळी ११:०० वाजता संपन्न होणार आहे रोकडे यांचा विशेष गुण वेळेची तत्परता, कर्तव्यदक्षता, हसतमुख आचरण आणि दांडगा प्रशासकीय अनुभव प्रखरतेने ग्रामस्थांनी अनुभवले सविस्तर वृत्त असे की दैत्यनांदूर हे मूळ गाव असलेले अशोक रोकडे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात प्रशासनात एक वेगळा ठसा उमटवला आहे.

शासकीय सेवेत काम करताना कायद्याच्या चौकटीत राहून त्यांनी नेहमीच सर्वसामान्यांचे हित जोपासले. फुंदे टाकळी आणि खरवंडी कासार येथे त्यांनी आपली शेवटची सेवा बजावली. या गावांमधील विकासकामांना गती देत त्यांनी नागरिकांच्या मनात हक्काचे स्थान निर्माण केले.

वेळेची कमालीची तत्परता, कामातील कर्तव्यदक्षता आणि दांडगा प्रशासकीय अनुभव ही त्यांच्या कामाची मुख्य वैशिष्ट्ये राहिली. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांशी हसतमुख आणि आपुलकीचे आचरण ठेवल्यामुळे ते लोकमान्य अधिकारी ठरले. त्यांच्या याच यशस्वी सेवाकाळाचा गौरव करण्यासाठी पाथर्डी येथील अर्जुना लॉन्स येथे या निरोप समारंभाचे आयोजन केले आहे.या सोहळ्याला तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, ग्रामसेवक संघटनेचे प्रतिनिधी तसेच फुंदे टाकळी, खरवंडी कासार व दैत्यनांदूर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व स्नेही आणि सहकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

(पान १ वरून)

## आमदार कर्डीले ते तनपुरेंचा भाजप प्रवेश

अचूक अंदाज घेत डॉ. सुजय विखे पाटील यांनी तनपुरे यांच्याशी संवादाची दारे खुली ठेवली आणि त्यांना भाजपमध्ये आणण्यासाठी पडद्यामागून महत्त्वाची भूमिका बजावली. एकीकडे अक्षय कर्डीले यांना आमदार करण्यात यश मिळवताना दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रभावी चेहरा असलेल्या प्राजक्त तनपुरे यांना भाजपमध्ये आणण्याची रणनीती त्यांनी यशस्वीपणे राबवली. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात भाजपची ताकद वाढविण्यामागे आणि नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव करण्यामागे डॉ. सुजय विखे पाटील हेच खरे सूत्रधार असल्याची चर्चा जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात आज रंगली आहे.

## आजोबावर गोळीबार करणारा फरार आरोपी एलसीबीकडून ताब्यात

आरोपी प्रवीण बाबासाहेब कोहकडे याने ठार मारण्याच्या उद्देशाने गावठी कट्टयातुन गोळीबार करुन पळून गेला होता. याबाबत राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. एलसीबीचे पथक आरोपीचा शोध घेत असतांना पथकास आरोपी हा बारागांव नांदुर ते मुळा डॅम परिसरामध्ये संशयितरित्या फिरत असल्याची माहिती मिळाली. पथकाने तात्काळ खात्री केली असता विनाक्रमांकाच्या दुचाकीवर आरोपी आढळून आला. त्याच्या ताब्यातून ३० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा व चार जीवंत काडतूस, दुचाकी असा २ लाख ४ हजार ६०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## बनावट महिला उभी करून शेतजमिनीची परस्पर विक्री

फुलचंद.ज. सूर्यवंशी (रा. लक्ष्मीनगर कोथरुड पुणे), संजय जनाजी सूर्यवंशी (रा.लव्हलेन भायखळा मुंबई) या सातजणांवर संगनमत करून फसवणूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील तिघांना अटक करण्यात आली आहे. दि.२३ ऑक्टोबर २०२३ रोजी महिला श्रीमती गुलाब शंकर सोनवणे (वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. राहुलनगर पारनेर) यांनी तक्रार अर्ज दिला की, मौजे हंगा येथील गट नंबर २१६ मध्ये माझ्या आईच्या नावे दीड एकर (साठ आर) क्षेत्र होते. परंतु माझी आई ही १९८४ मध्ये मयत झाल्यानंतर वारस म्हणून माझे भाऊ दिनेश शंकर सोनवणे, अशोक शंकर सोनवणे, जगन्नाथ शंकर सोनवणे, संजू शंकर सोनवणे, बहीण रेखा शंकर सोनवणे व अर्जदार असे वारस लागणे अपेक्षित होते. परंतु सातबारा उताऱ्यावर अर्जदार व अर्जदार यांचे बहीण–भाऊ यांचे नाव न लागता त्यांच्या मयत आईचे नाव सातबारा उताऱ्यावर तसेच राहीले. त्यानंतरअजित हिराभाऊ सोनवणे (रा. निघोज ता. पारनेर) याने मूळ मालक चंपाबाई शंकर सोनवणे या मयत झालेल्या असताना, त्यांच्या जागी सौ.चंपा शंकर सूर्यवंशी (माहेरचे नाव) व चंपाबाई मधुकर सोनवणे (सासरचे नाव) वय ६५ वर्षे रा.रुम नंबर ३१२ बीआयटी चाळ शिवडी मुंबई या नावाची कोणीतरी अज्ञात महिला लिहून देणार म्हणून दि.११ मार्च २०१९ रोजी उभी करून व त्याच दिवशी कुलमुखत्यारपत्र करुन घेऊन या कुलमुखत्यारच्या आधारे जमिनीचे खरेदीखत दस्त क्रमांक १८७३/२०२२ अन्वये दि.२३ मार्च २०२२ रोजी स्वतःच्या नावाने खरेदी करुन नंतर त्याच दिवशी दि. २३ मार्च रोजी साठे खरेदीखत क्रमांक १८७५/२०२२ अन्वये नवनाथ सखाराम कावळे (वय ३६ वर्षे रा.पिंपरी कावळ ता.जि. पुणे) यांचे नावे करुन दिले. त्यांनी दि. २५ मे २०२३ रोजी सदरचे क्षेत्र हे स्वतःच्या नावाने करुन घेतलेले आहे, असे तक्रार अर्ज कार्यालयास प्राप्त झाला होता.

तक्रार अर्जाची चौकशी चालू असताना नवनाथ सखाराम कावळे हा सदर जमीन ही विश्वनाथ गणपत चौधरी (रा.शिरसुले ता. पारनेर) व सुनीता ज्ञानदेव दाते (रा.लोणी हवेली ता. पारनेर) यांना विक्री करण्यासाठी खरेदी दस्तासह दुय्यम निबंधक कार्यालय पारनेर येथे समक्ष आले असता दुय्यम निबंधकांनी सदर जमिनीची कोणासही विक्री करु नका अगर ती कोणी विकत घेऊ नका. सदर जमिनीबाबत पूर्वी वारसांना डावलून अज्ञात महिला उभी करुन चुकीचा दस्त झालेला असून मूळ मालकांनी माझ्याकडे तक्रार अर्ज केलेला असून त्यांची चौकशी चालू आहे असे सांगितले. त्यावर लिहून देणार नवनाथ सखाराम कावळे व लिहून घेणार विश्वनाथ गणपत चौधरी व सुनीता ज्ञानदेव दाते यांनी त्याकडे दुर्लक्ष करुन नवनाथ कावळेचे नाव सातबारा उताऱ्यावर आहे असे सांगून दि.१७ एप्रिल २०२५ रोजी खरेदी दस्त केला व सातबारा उताऱ्यावर विश्वनाथ गणपत चौधरी व सुनीता ज्ञानदेव दाते यांची नावे लावून घेतली. गैरअर्जदारांना चौकशी कामी हजर राहण्याबाबत नोटीस पाठवुन त्यांना बोलाविले असता. सदर अर्जातील गैरअर्जदार नवनाथ सखाराम कावळे, शंकर दशरथ चत्तर (रा. जांबुत ता. पारनेर), नवनाथ श्रीहरी गाजरे (रा. जांबुत ता. पारनेर), किरण गुजाबा शिंदे (रा.ठक्कर बप्पा कॉलनी चेंबुर मुंबई) व विकास पाडळे (रा.ठक्कर बप्पा कॉलनी चेंबूर मुंबई) हे चौकशी कामी समक्ष हजर राहिले. त्यांनी सदर जमीन ही कायदेशीररित्या अजित हिराभाऊ सोनवणे यांच्या नावे असल्याने आम्ही त्यांच्यासोबत व्यवहार केलेला असून तो कायदेशीर असल्याने आम्ही त्यांच्याकडून खरेदी घेतलेली आहे. खरेदी वेळी आम्ही साक्षीदार व व ओळख पटविणार म्हणून हजर राहून सह्या केलेल्या आहेत. अजित हिराभाऊ सोनवणे यांने सदरची जमीनही कोणाकडून व कशी घेतली होती त्यांने कोणाची फसवणूक केलेली होती अगर कसे याबाबत आम्हास काही एक माहिती नाही. आम्ही खरेदी देणार व खरेदी घेणार यांच्या ओळखीचे असल्याने त्यांनी हजर राहण्याचे सांगीतल्याने आम्ही हजर राहून सह्या केलेल्या आहेत असे सांगितले. या प्रकरणी मयताच्या नावावर दुसरी महिला उभी करून व बनावट कुलमुखत्यारपत्र बनवून फसवणूक केल्या प्रकरणी सातजणांवर संगनमताने फसवमूक केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पारनेर हद्दीत ७ हॉटेल्सवर कारवाई

करण्यात आली. या कारवाईत एकूण ८३ हजार ४९० रुपयांची देशी–विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. ताब्यात घेतलेल्या सर्व आरोपींविरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, पोसई विनोद परदेशी, सफौ राकेश खेडकर, पोहेकॉ राजू सुद्रीक, भास्कर मिसाळ, मुकुंद दुधाळ, साईनाथ टेमकर आणि पोकॉ दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, अक्षय रोहोकले, उमेश शेरकर व सुधीर गवारे यांच्या पथकाने केली.

## लाखोंच्या चांदीच्या पार्टवर कंपनीतील कर्मचाऱ्याचा डल्ला

कंपनीतच काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर संशय आला. पोलिसांनी अभिषेक प्रभाकर शिंदे (वय २६, रा. निंबळक, ता. जि. अहिल्यानगर) याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या अभिषेकने पोलिसी खाक्या दाखवताच गुन्ह्याची कबुली दिली. चोरी केलेला सर्व मुद्देमाल त्याने आपल्या घरात लपवून ठेवला होता, जो पोलिसांनी जप्त केला आहे.

पथकात यांचा सहभाग

ही कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, पोसई विकास जाधव, सफौ राकेश खेडकर, राजू सुद्रीक, सचिन आडबल, दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राजेश राठोड, राहुल गुंडू आणि अरुण सांगळे यांच्या पथकाने केली.पुढील तपास पोसई विकास जाधव करत आहेत.

## जनगणना जनजागृतीसाठी डॉ. अमोल बागुल यांची ‘जनगणना ब्रँड अँबेसिडर’

व्यापक स्वरूप देण्यात येत आहे. आकाशवाणी व विविध रेडिओ चॅनेलवरील विशेष मुलाखती, दररोज जिंगल स्वरूपातील जनगणना आवाहन, विविध एआय टूल्सचा वापर करून इमेज, व्हिडिओ, पीडीएफ व अन्य नाविन्यपूर्ण निर्मिती, वृत्तपत्रांमधून सातत्यपूर्ण जनजागृतीपर बातम्या,सी–व्हिडिओंची विशेष मालिका,‘‘माझा भारत माझी जनगणना’’ या वेबपेजची निर्मिती,जनगणना टोल फ्री क्रमांक, हॅशटॅग निर्मिती,सोशल मीडिया हँडल्ससाठी प्रचार साहित्य निर्मिती,जनगणना विषयक गाणी, रिंगटोन व जिंगल्सची निर्मिती,फेसबुक, व्हॉट्सअॅप, इंस्टाग्राम, युट्युब व बल्क मेसेज प्रणालीद्वारे व्यापक जनसंपर्क आदी उपक्रमात डॉ.बागुल यांचा सहभाग आहे.या उपक्रमांना मुख्य जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, प्र. उपायुक्त शहाजान तडवी, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, जनगणना विभाग प्रमुख राकेश कोतकर तसेच सर्व प्रभाग अधिकारी, सर्व मास्टर ट्रेनर व पर्यवेक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे.

## तनपुरेंच्या पक्षप्रवेशात रंगला दोन ‘दादां’चा अलिंगन सोहळा

केलं होतं. परंतु आता तनपुरे–विखे ही नवी युती राहुरीच्या विकासाला नवी दिशा देणारी ठरेल, अशा विश्वास तनपुरेंच्या कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केला. तनपुरे यांना मिठी मारण्याची कार्यकर्त्यांची इच्छाही सुजय विखेंनी पूर्ण केली. त्यावेळी टाळ्यांचा कडकडाट झाला. हे सगळा पक्षप्रवेश पाहिल्यावर तनपुरेंना विखेंनीच भाजपमध्ये आणलंय, यावर शिक्कामोर्तब झालं. या पक्षप्रवेशानंतर राहुरीची गणिते नक्कीच बदलतील, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## श्री अवतार मेहरबाबा परपिच्युअल चॅरिटेबल ट्रस्ट यंदाच्या वर्षी २००० वृक्ष लावणार– फरमरोज मिस्त्री

आज १५० एकर ट्रस्टच्या जागेवर सुमारे ७० ते ७५ हजार वृक्ष डामडौलाने उभे आहेत यात रेसिडेन्शिल जागेचाही समावेश आहे. अनेक अडचणीच्या पाणी टंचाईच्या वेळी या वृक्षांना टँकरद्वारे देखील पाणी देऊन ती जगवली आहेत. यात विविध देशातुन,राज्य , प्रांतातुन येणाऱ्या भक्तांचा सहभाग मोलाचा असतो.ट्रस्टी – मेहेरनाथ कलचुरी, रमेश जंगले, डॉली केरावाला, प्रसाद राजु, अमृतदारा इराणी, गोपीकाला, योहान नोबल, राखी शर्मा यांचे चांगले मार्गदर्शन व रोटरी क्लबचे राकेश गागरे, नितीन थाडे व सर्व पदाधिका–यानचे मोलाचे सहकार्य मिळत आहे

यंदाच्या वर्षी हा वृक्ष लागवडीचा उपक्रम हैद्राबादचे बाबांचे अनुयायी व इंजि. राजेंद्र मेहेर बोलताना म्हणाले कि संकल्पित २००० वृक्ष लागवडीचा शुभारंभ नुकताच अरणगाव रस्त्यावरील मेहेरबाबा सेंटर पाशी २०० नारळाची व २०० आंब्यांच्या विविध प्रजातीं ची झाडे लावून करण्यात आला. या वृक्ष लागवडीसाठी विदर्भातील वाशिम,वर्धा,अमरावती येथील मेहेरबाबा सेंटरचे भक्त मोठ्या उत्साहाने सहभागी झाले असुन त्यांच्या ४ दिवसांच्या वास्तव्यात त्यांनी वृक्षारोपणासाठी सर्वतोपरी सहकार्य केले. पहाटे ५ वाजल्यापासुन दुपारी विश्रांतीची वेळ सोडता त्यांनी वृक्षाची लागवड पूर्ण केली.या वृक्षांसाठी जवळच एक कृत्रिम पाण्याच्या साठवण तलावाची निर्मिती करण्यात आली आहे या वृक्षांचे संरक्षण व संवर्धन उत्तम व्हावे यासाठी कुंपण लावण्यात आल्याचे ते म्हणाले. राहिलेल्या वृक्षांची लागवड थोड़ा पाऊस सुरू झाल्यावर केली जाईल. कारण सद्या उन्हाळा कडक आहे. असे मेहेर म्हणाले.भक्तांनी, नगरवासियांनी जरूर अरणगाव सेंटरला भेट घावी. व समक्ष अनुभव, येथील प्रसन्नता अनुभवावी असे आवाहन ट्रस्ट. च्या वतीने करण्यात आले आहे.